# प्रतिनियुक्तीने पद भरतीची जाहिरात

## क्र. आस्थापना/ प्रबोधिनी/ पदभरती प्रस्ताव/ ३६७/२०२१, दि. २९.०४.२०२१

## डॉ. पंजाबराव देशमुख विदर्भ प्रशासकीय व विकास प्रशिक्षण प्रबोधिनी, अमरावती.

डॉ. पंजाबराव देशमुख विदर्भ प्रशासकीय व विकास प्रशिक्षण प्रबोधिनी, अमरावती या संस्थेमध्ये राज्य प्रशिक्षण धोरण २०११ नुसार राज्य प्रशिक्षण कार्यक्रम अंतर्गत शासन सेवेतील अधिकारी वर्ग-२ व वर्ग-३ च्या कर्मचाऱ्यांसाठी प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित करण्यात येतात. शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग/ कार्या-१२ अ, मंत्रालय, मुंबई यांच्या दि. ११ मे, २०१५ मध्ये नमुद केलेली पदे भरण्याची कार्यपध्दती व प्रतिनियुक्तीने भरण्यात येणाऱ्या पदांच्या कर्तव्ये व जबाबदाऱ्या विहित केल्या आहेत.

त्यास अनुसरुन शासन सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय मुंबई या विभागाच्या अधिपत्याखालील डॉ. पंजाबराव देशमुख विदर्भ प्रशासकीय व विकास प्रशिक्षण प्रबोधिनी, अमरावती या कार्यालयातील राज्य प्रशिक्षण कार्यक्रम अंतर्गत खालील नमूद केलेली पदे शासकीय अधिकारी/ कर्मचारी यांचे मधून प्रतिनियुक्तीने भरण्यासाठी विहित नमुन्यात अर्ज मागविण्यात येत आहेत. अशा संवर्गात इच्छूक किंवा पात्र उमेदवार न मिळून आल्यास निम्न संवर्गात व श्रेणीमध्ये समकक्ष पदावरील पदोन्नातीसाठी विहीत केलेली अर्हता व अनुभव पूर्ण करणाऱ्या शासकीय अधिकारी / कर्मचारी यांचाही या पदावर प्रतिनियुक्तीसाठी विचार केला जाईल.

| अ. क्र | पदनाम | गट | पदांची संख्या | आवश्यक अर्हता |
|---|---|---|---|---|
| १ | संचालक<br>१५६००-३९१००+ग्रेड पे ७६००/- | अ | १ | अतिरीक्त जिल्हाधिकारी किंवा अतिरीक्त मुख्य कार्यकारी अधिकारी किंवा जिल्हा दर्जाच्या सेवेतील या वेतनश्रेणीतील पदांतून प्रतिनियुक्तीने भरण्यात येईल |
| २ | निबंधक तथा सहायक प्राध्यापक वर्ग-१<br>१५६००-३९१००+ग्रेड पे ५०००/- | अ | १ | सदर पद हे उपमुख्य कार्यकारी / उपजिल्हाधिकारी संवर्ग, प्रशासकीय कामकाज व प्रशिक्षण विषयक कामाचा अनुभव असल्यास प्राधान्य |
| ३ | सहायक प्राध्यापक वर्ग-१<br>१५६००-३९१००+ग्रेड पे ५०००/- | अ | ८ | १)लोकप्रशासन व कायदे अंमलबजावणी किंवा महसूल विभागाचा विषयाशी संबधीत -२ पदे<br>२)ग्राम-कृषी विकासाशी संबधीत -२ पदे<br>३)समाजकल्याण व आदिवासी विकास संबधीत-१ पद<br>४) नागरी विकास संबधीत -१ पद<br>५)अभियांत्रीकी व आरोग्य सेवे संबधीत - १ पद<br>६) वित्त विषयक बाबीं संबंधी -१ पद |
| ४ | कार्यालयीन अधिक्षक/ स्टेनोग्राफर वर्ग-३<br>९३००-३४८००+ग्रेड पे ४२००/- | क | १ | प्रतिनियुक्तीने भरण्यात येईल |
| | | एकूण | ११ | |

२. प्रतिनियुक्तीने नियुक्ती प्रथमत: एका वर्षाच्या कालावधीसाठी राहील, तदनंतर आवश्यकता विचारात घेऊन संबंधी अधिकारी यांची इच्छुकता व प्रतिनियुक्तीने सेवा देणाऱ्या संवर्ग नियंत्रण प्राधिकाऱ्याच्या संमतीने हा कालावधी जास्तीत जास्त ५ वर्षपर्यत वाढविता येईल.

३. सर्व प्रशासकीय विभागांना विनंती करण्यात येते की, सदर परिपत्रक त्यांच्या अधिपत्याखालील कार्यरत असलेल्या वर नमूद केलेल्या संवर्गातील सर्व अधिकारी यांच्या निदर्शनास आणण्यात यावे.

४. सदर पदावर प्रतिनियुक्तीने नियुक्तीसाठी इच्छुक व पात्र अधिकारी/ कर्मचारी यांनी त्यांचे अर्ज सोबत जोडलेल्या विहीत नमून्यात टंकलिखित करून त्यांच्या प्रशासकीय विभागामार्फत निम्न स्वाक्षरीतांकडे दि. २१/०७/२०२१ पर्यत पोहचतील अशा बेताने पाठवावे.

५. प्रतिनियुक्तीने नियुक्ती घेऊ इच्छिणाऱ्या अधिकारी / कर्मचारी यांनी ते सद्या शासन सेवेत असल्याबाबतचे त्यांच्या कार्यालय प्रमुखाचे प्रमाणपत्र अर्जासोबत जोडावे.

६. शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग (कार्या-१२), दि. १७.१२.२०१६ व समक्रमांक दि. १६.०२.२०१८ व सामान्य प्रशासन विभाग/ (कार्या-१२अ), दि. ११.०५.२०१५ मधील निर्धारित तरतुदी, अटी व शर्तीनुसार प्रतिनियुक्तीने नियुक्ती देण्याबाबत अर्जाची तपासणी करण्यात येईल.

७. प्रशासकीय विभागांनी / संवर्ग नियंत्रक विभागानी परिपूर्ण स्वरुपातील अर्ज त्यांचे आवश्यक प्रमाणपत्रांसह व संबंधीत अधिकारी/ कर्मचारी यांच्या मागील ५ वर्षाचे गोपनिय अहवालाच्या सत्यप्रतीसह या विभागाकडे कोणत्याही परस्थीतीत दि. २१/०७/२०२१ पर्यत पाठवावेत. विहीत मूदतीत अर्ज प्राप्त न झाल्यास अशा अधिकारी / कर्मचारी यांचा विचार केला जाणार नाही.

८. अंतिम दिनांकास प्राप्त अर्जाची छाननी केल्यानंतर पात्र अर्जाबाबत प्रस्ताव सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडे पुढील कार्यवाहीसाठी पाठविण्यात येतील.

सदर जाहीरात www.maharastra.gov.in, www.amravatiprabodhini.org व http//amravatidivision. gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध राहतील.

**कार्यालयाचा पत्ता**- डॉ.पंजाबराव देशमुख विदर्भ प्रशासकीय व विकास प्रशिक्षण प्रबोधिनी,विद्यापीठ रोड तपोवन गेट जवळ, अमरावती.पिन कोड क्र. ४४४६०२ फोन न. ०७२१-२६६८१७६

संचालक
**डॉ. पंजाबराव देशमुख विदर्भ प्रशसकीय**
**व विकास प्रशिक्षण प्रबोधिनी, अमरावती.**

महाराष्ट्र शासन

सामान्य प्रशासन विभाग (कार्या-१२अ)

परिशिष्ट-क

## प्रतिनियुक्तीने नियुक्तीसाठी अर्जदारांनी सादर करावयाचा अर्जाचा नमुना

१. नाव (संपूर्ण नाव) ------------------------------------------

२. ज्या पदासाठी अर्ज केला आहे ते पद व ------------------------------------------

कार्यालयाचे नाव :------------------------------------------

३.(अ) सध्या धारण केलेले पद व पदस्थापनेचे ठिकाण :------------------------------------------

(ब) वेतनश्रेणी ------------------------------------------

४. सध्या कार्यरत असलेल्या पदाचा संवर्ग नियंत्रक विभाग : ------------------------------------------

५. जन्म दिनांक :------------------------------------------

६. अर्ज सादर करणेचे अंतिम दिनांकास वय (वर्ष व महिना) ------------------------------------------

७. शैक्षणिक अर्हता ------------------------------------------ :

८. मागासवर्गीय असल्यास प्रवर्ग : ------------------------------------------

९. सध्या धारण केलेले पद नियमित आहे किंवा :------------------------------------------

तात्पुरते आहे. नियमित असल्यास नियमित दिनांक ------------------------------------------

१० घोषित केलेला स्वग्राम तालुका व जिल्हा ------------------------------------------ :

११. शैक्षणिक अर्हता व अनुभव :

शैक्षणिक अर्हता : १.------------------------------------------

: २. ------------------------------------------

: ३.------------------------------------------

अनुभव : १. ------------------------------------------

: २. ------------------------------------------

३.------------------------------------------

१२. आतापर्यंत केलेल्या सेवेचा तपशील :

(जागा कमी असल्यास स्वतंत्र विवरणपत्र जोडावे व

त्यावर स्वत:ची स्वाक्षरी करावी)

| कार्यालय/विभाग | पद ( संवर्ग अथवा प्रतिनियुक्तीवर) | कालावधी | | वेतनश्रेणी | कामाचे स्वरुप |
|---|---|---|---|---|---|
| | | पासून | पर्यंत | | |
| | | | | | |
| | | | | | |

१३. संपर्क तपशील -----

(अ) पत्ता :- ------------------------------------------------------

------------------------------------------------------

------------------------------------------------------

दूरध्वनी क्र. ------------------------------------------------

ई मेल ------------------------------------------------

भ्रमणध्वनी क्रमांक------------------------------------ :

(ब) कार्यालयीन पत्ता :-----------------------------------------------

-----------------------------------------------

दूरध्वनी क्र--------------------------------------------.

ई मेल -----------------------------------------

मी श्री/श्रीमती-------------------------------------------असे प्रमाणित करते/करतो की, मी प्रतिनियुक्तीने भरावयाच्या पदांच्या मागणीपत्रातील तपशील वाचले असून ,सदर पदासाठी विहित केलेल्या अर्हता मी धारण करीत असल्याने सदर पदावर प्रतिनियुक्तीने नियुक्तीसाठी अर्ज सादर करीत आहे. अर्जात नमूद केलेली माहिती खरी असून ,खोटी आढळून आल्यास माझा अर्ज नाकारला जावू शकतो यांची मला जाणीव आहे.

सही/-----------------------------------------

नाव -----------------------------------------

पदनाम---------------------------------------

<u>प्रशासकीय विभाग व संवर्ग नियंत्रक विभागाने भरावयाचा तपशिल</u>

प्रमाणित करण्यात येते की,

१. श्री/श्रीमती ------------------------------------ पद ---------------- यांनी सादर केलेला अर्ज तपासला असून त्यांनी अर्जामध्ये दिलेली माहिती सेवा अभिलेखानुसार बरोबर आहे.

२. श्री/श्रीमती ------------------------------------ पद ---------------- यांची प्रतिनियुक्तीच्या पदासाठी निवड झाल्यास त्यांना प्रतिनियुक्तीच्या पदावर हजर होण्यासाठी कार्यमुक्त करण्यात येईल.

३. श्री/श्रीमती ------------------------------------ पद ---------------- यांचेविरुध्द मनासे (शिस्त व अपील) नियम १९७९ मधील नियम ८ नुसार कोणतीही विभागीय चौकशी सुरु नाही अथवा त्यांचेविरुध्द भ्रष्टाचार/लाचलूचपत गुन्ह्यासंदर्भातील प्रकरण, फौजदारी प्रकरण प्रलंबित नाही.

४. श्री/श्रीमती ------------------------------------ पद ---------------- यांचेविरुध्द कोणत्याही शिक्षेची अंमलबजावणी चालू नाही.

५. श्री/श्रीमती ------------------------------------ पद ---------------- यांना मागील १० वर्षाच्या कालावधीमध्ये झालेल्या गंभीर अथवा किरकोळ शिक्षेचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| पद | शिक्षेचे स्वरुप | शिक्षा संपुष्टात आल्याचा दिनांक |
|---|---|---|
| | | |
| | | |

६. प्रमाणित करण्यात येते की, श्री/श्रीमती ------------------------------------ हे कार्यरत असलेल्या संवर्गामध्ये अर्ज अग्रेषित करण्याच्या दिनांकास १० टक्के पेक्षा अधिक पदे रिक्त नाहीत.

७. श्री/श्रीमती ------------------------------------ यांना प्रतिनियुक्तीने ------------- या पदावर -------- --------------- या कार्यालयात नियुक्ती करण्यास या विभागाची हरकत नाही.

८. श्री/श्रीमती -------------------------------- यांच्या उपलब्ध असलेल्या मागील ५ वर्षाच्या गोपनीय अहवालाच्या सत्यप्रती सोबत जोडून पाठविण्यात येत आहेत.

सही / -

दिनांक --------------

( नाव ---------------)

पदनाम---------------

-----------------विभाग